पुढारी

# शंभराव्या संमेलनाच्या समारोपापूर्वी ज्येष्ठ कलाकारांसाठीच्या वृद्धाश्रमाचे भूमिपूजन

## शंभराव्या नाट्यसंमेलनाच्या पुण्यातील शुभारंभप्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत यांची ग्वाही

**पुणे : अनुपमा गुंडे**

दिवंगत अभिनेते विक्रम गोखले यांनी पुण्याजवळ ज्येष्ठ कलावंतांच्या वृद्धाश्रमासाठी दिलेल्या जागेवर शंभराव्या नाट्यसंमेलनाच्या रत्नागिरी येथे होणाऱ्या सांगता सोहळ्यापूर्वी वृद्धाश्रमाचे भूमिपूजन होईल असे आश्वासन राज्याचे उद्योगमंत्री व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त उदय सामंत यांनी दिले. यापुढील काळात नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान साहित्य संमेलन अध्यक्ष प्रमाणे ज्येष्ठ कलावंतांना मिळावा, यासाठी नाट्य परिषदेने व नियमक मंडळांनी त्यात आवश्यक ते बदल करावेत. परिषदेच्या निवडणुकीत आणि नाट्य क्षेत्रात राजकारणाचा लवलेशही नसावा, अशा पद्धतीने परिषदेचे कामकाज चालावे अशी अपेक्षा सामंत यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या १०० व्यां नाट्य संमेलनाच्या विभागीय संमेलनाचा शुभारंभ सोहळा पुण्यातील गणेश क्रीडा मंच येथे पार पडला त्यावेळी सामंत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर १०० व्या नाट्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष जब्बार पटेल, अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, परिषदेचे तहहयात विश्वस्त शशी प्रभू, श्रीनिवास पाटील, माजी संमेलनाध्यक्ष गंगाराम गवाणकर, सुरेश खरे, दत्ता भगत, ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, परिषदेचे कार्यवाह अजित भुरे, कोषाध्यक्ष सतीश लोटके,उपाध्यक्ष नरेश गडेकर व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सामंत यांनी शंभरावे नाट्यसंमेलन परिषदेच्या अंतर्गत कारणांमुळे कसे लांबले याचा पाढा वाचला. नाट्य परिषदेने बुजुर्ग मंडळींना न्याय दिला पाहिजे हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टी त मोठी तफावत आहे. माणसासाठी मराठी रंगभूमीसाठी अडचणी येत असतील तर त्यांच्या मागे नाट्य परिषदेने मोठ्या ताकदीने उभे राहण्याची गरज सामंत यांनी व्यक्त केली.

नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले म्हणाले, शासनाने कितीही मदत केली तरी त्याच्या उत्तरदायित्वाची जबाबदारी कलाकार म्हणून आपली ही आहे, असे मत व्यक्त केले. पुढच्या पिढीतील रसिक घडावेत यासाठी पालकांनी मुलांना नाटक दाखवावे असे आवाहनही दामले यांनी केले.

नाट्य संमेलन अध्यक्ष प्रेमानंद गज्वी मराठी रंगभूमी पुढील काळात भारताचे प्रतिनिधित्व करेल अशी अपेक्षा व्यक्त केली. कोरोना आणि त्यानंतरच्या काळात परिषदेतील वादामुळे आपल्याला पाच वर्ष नाट्य संमेलनाचे अध्यक्ष पद सांभाळायला लागले याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. कलावंत एकटा मोठा होत नसतो तो मधुकर गोळा करत मोठा होतो असे ते म्हणाले. नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष मेघराज भोसले यांनी प्रास्ताविक केले दीपक रेगे यांनी आभार मानले



**मुंबई : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या १०० व्या नाट्य संमेलनाचा शुभारंभ गणेश कला क्रीडा मंच, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी खासदार श्रीनिवास पाटील, डॉ.जब्बार पटेल, प्रेमानंद गज्वी, सुरेश खरे, दत्ता भगत, अध्यक्ष प्रशांत दामले, उपाध्यक्ष नरेश गडेकर, विश्वस्त शशी प्रभू ,अशोक हांडे, मोहन जोशी, प्रमुख कार्यवाहक अजित भुरे, कोषाध्यक्ष सतीश लोटके, सुनील ढगे, पुणे शाखा अध्यक्ष मेघराज राजे भोसले आदी उपस्थित होते.**

### पुणे नाट्यसंमेलनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाकडे नेत्यांनी फिरवली पाठ

पुणे : येथे सुरू झालेल्या शंभराव्या नाट्यसंमेलनाच्या उद्‌घाटनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे एका व्यासपीठावर असतील, अशी अपेक्षा नाट्यरसिकांना होती. प्रत्यक्षात, उद्योगमंत्री उदय सामंत हेच कार्यक्रमास उपस्थित होते. इतर नेत्यांनी मात्र शुक्रवारी कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. शरद पवार आणि अजित पवार हे दोघेही कार्यक्रमासाठी एकाच मंचावर उपस्थित राहतील, असे नाट्यरसिकांना वाटले होते. तथापि, दोघेही कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. आता पिंपरी-चिंचवडमधील संमेलनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात तरी दोघे एकत्र असतील का, हे शनिवारी (६ जानेवारीला) नाट्यरसिकांना पाहायला मिळेल. शंभराव्या नाट्यसंमेलनाच्या पुण्यातील उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला उद्योगमंत्री सामंत नाट्य परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष या नात्याने उपस्थित होते.